**नि.दि.दा. क्र. १०७/२०२३**
वनिता वि कार्यकारी अभियंता
**निशाणी क्र. ४३**

**वादीतर्फे साक्षीदारची जबानी शपथेवर सुरु.**

**नाव** – मिलींद नागनाथ विटकर
**वय** – ४५ वर्षे,
**व्यवसाय** – नोकरी, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परंडा.
**राहणार** – परंडा.

**साक्षीदारचा सरतपास शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एन. माने यांचेमार्फत सुरुः–**

फेब्रुवारी २०१५ मध्ये मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परंडा अंतर्गत सज्ञा लोणी येथे कृषी सहायक पदावर कार्यरत होतो. फेब्रुवारी २०१५ मध्ये सज्ञा लोणी येथे ऊस जळालेबाबत पंचनामा करण्यासाठी तहसीलदार यांनी पाठविले होते. पंचनामा करण्यासाठी मी गट क्र. ४३९ मध्ये दिनांक २४/०२/२०१५ रोजी गेलो होतो. गट क्र. ४३९ हा वनिता उत्तम शिंदे यांच्या मालकीचा आहे. पंचनाम्यावेळी माझ्यासोबत तलाठी, मंडळ अधिकारी व पाच पंच होते. गटामध्ये गेल्यानंतर असे दिसून आले की, तेथील ऊस व ठिबक जळाले होते. घटनास्थळावरील ऊस हा लाईटचे तारा स्पार्किंग झाल्यामुळे जळाल्याचे दिसुन आले. सदरील ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी मी, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी केली. पाहणी केल्यानंतर पंचनामा लिहिला. पंचनामा हा तलाठी यांनी लिहिला. पंचनामा लिहिल्यानंतर त्यातील मजकुर पाच पंचांना वाचुन दाखवला व त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या. आता मला दिनांक २४/०२/२०१५ रोजीचा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर तलाठी श्री. माळी, मंडळ अधिकारी, पंच व माझी सही आहे. सदरचा पंचनामा हा तलाठी श्री. माळी यांच्या हस्ताक्षरात लिहिला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येते. ऊस हा ६०आर क्षेत्राएवढा जळाला होता.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ यांचा पुकारा केला असता गैरहजर. निशाणी क्र. ४५ वरील प्रतिवादी यांचा अर्ज नामंजुर. सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास नाही.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.09.09 17:29:20 +0530

दिनांकः ०९.०९.२०२५

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.